महाराष्ट्र शासन

दर्शनि - २०१९ / प्र.क्र.१४/सांका.-२.
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ जुलै, २०१९

प्रति,

सह/उप सचिव (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

विषय :- या विभागाच्या अधिपत्त्याखालील दर्शनिका विभाग, मुंबई येथील अधिक्षक प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत...

संदर्भ : १) सा.प्र.वि.शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/का.१२, दि.१७.१२.२०१६
२) सा.प्र.वि.शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१२०/१४, दि.३१.०८.२०१७
३) सामान्य प्रशासन विभागाचे क्र.एएससी २५१९/प्र.क्र.८६/१४-अ, दि.१९.०६.२०१९ चे पत्र

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्त्याखालील कार्यालय दर्शनिका विभागातील अधिक्षक हे १ पद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने सं.क्र.३ येथील दि.१९.०६.२०१९ च्या पत्रान्वये मंत्रालयीन संवर्गातील सहायक कक्ष अधिकारी यांच्याकडून इच्छुकता मागविली होती. परंतू एकही कर्मचारी उपलब्ध झाला नाही.

०२. या पत्रान्वये दर्शनिका विभागातील अधिक्षक हे रिक्त पद प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्त्याखालील कार्यालयांकडून खालीलप्रमाणे इच्छुकता मागविण्यात येत आहे.

अ.क्र.	**कार्यकारी संपादक व सचिव दर्शनिका विभाग, मुंबई कार्यालयातील पदनाम**	**वेतनश्रेणी (सहाव्या वेतन आयोगानुसार)**	**मंत्रालयीन संवर्गातील पदनाम**	**मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्त्याखालील समकक्ष वेतनश्रेणीतील कर्मचारी**
	अधिक्षक	९३००-३४८०० (ग्रेड वेतन.४३००/-)	सहायक कक्ष अधिकारी	अधिक्षक तथा समकक्ष वेतनश्रेणीतील कर्मचारी

०२. उपरोक्त पदावर प्रतिनियुक्तीने जाण्यासाठी इच्छुक मंत्रालयीन विभागातील, सहायक कक्ष अधिकारी तथा मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्त्याखालील कार्यालयातील इच्छुक कर्मचाऱ्यांनी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे अर्ज सादर करावा. कोणत्याही परिस्थितीत या विभागाकडे थेट अर्ज

करु नयेत तसेच प्रत देखिल अंकीत करु नये.

०३. सर्व संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी आपल्या विभागातील तसेच अधिनस्त कार्यालयातील इच्छुक कर्मचाऱ्यांचे एकत्रित अर्ज प्राप्त झाल्यानंतर संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदीनुसार अर्जांची छाननी करुन खालील माहितीसह आपल्या विभागाच्या सचिवांच्या मान्यतेने इच्छुक कर्मचाऱ्यांचा प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव खालील माहितीसह या कार्यासनाकडे दि.३०.०८.२०१९ पर्यंत पोहोचेल अशा रितीने पाठवावा.

१.	कर्मचाऱ्याचे संपूर्ण नांव व पदनाम	
२.	जन्मदिनांक	
३.	सेवानिवृत्तीचा दिनांक (पहा शा.नि.दि.१७.१२.२०१६ मधील तरतूद ५ (ब)(६)	
४.	शैक्षणिक अर्हता	
५.	भ्रमणध्वनी क्रमांक	
६.	मागील ५ वर्षांच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत.)	
७.	मत्ता व दायित्व सादर केली आहेत का? (दि.३१.०३.२०१९ रोजीचे)	
८.	५०/५५ व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे का?(पद, ठिकाण व कालावधी)	
९.	संबंधित कर्मचाऱ्याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास त्याबाबतचा तपशील (पद, ठिकाण व कालावधी)	
१०.	संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे काय?	

०४. एकदा निवड झालेल्या कर्मचाऱ्याला त्याचे नाव मागे घेता येणार नाही. तसेच, आपल्या विभागातून सदर पदावर प्रतिनियुक्तीसाठी जाण्यास कोणीही कर्मचारी इच्छुक नसल्यास तसेही या विभागास कळवावे तसेच दि.३०.०८.२०१९ पर्यंत अर्ज प्राप्त झाले नाहीत, तर आपल्या विभागाकडून तसेच आपल्या अधिनस्त कार्यालयाकडून कोणीही इच्छुक नसल्याचे समजण्यात येईल.

०५. सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०७२९११००४६०७२३ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

आपला,

Prasad Mahadeo Mahajan

Digitally signed by Prasad Mahadeo Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6fcffe7574d536c6e270856345547bb470a3e70655baa82e214fc4d0cfaccaed, serialNumber=b8ea3f1827aabafa30caec97c98f4c9643851c3a32cfa11a13f635fc0bea0ac3, cn=Prasad Mahadeo Mahajan
Date: 2019.07.29 14:52:13 +05'30'

(प्रसाद महाजन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. कार्यकारी संपादक व सचिव,दर्शनिका विभाग,मुंबई.
२. सह/उप सचिव(का-१४)सामान्य प्रशासन विभाग,
३. निवड नस्ती.-सां.का.२.